# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक १६

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **सोमवार दि. १९/७/२०२१** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

विषय क्र. ५३९

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगडरोड, धनकवडी–सहकारनगर व वारजे–कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील दि. १/६/२०२१ ते दि. ३०/६/२०२१ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/२०७७ दि.७/७/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ५४०

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ चे अखत्यारीत येणाऱ्या ढोले पाटील रोड/येरवडा–कळस/नगर रोड (वडगांवशेरी) क्षेत्रिय कार्यालयाकडील माहे जून २०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा. उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. १ यांचे जा.क्र. उप–१/१६६५ दि.८/७/२०२१ चे पत्र.

विषय क्र. ५४१

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ कार्यालयाचे नियंत्रणाखालील भवानी, बिबवेवाडी, कसबा–विश्रामबागवाडा, महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालयांकडील माहे मे २०२१ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/२४२१ दि. ९/७/२०२१ चे पत्र.

### माहितीसाठी आलेले विषय

विषय क्र. ५४२

उप आयुक्त, परिमंडळ क्र. २ कार्यालय अधिनिस्त औंध–बाणेर, शिवाजीनगर–घोलेरोड व कोथरुड–बावधन क्षेत्रिय कार्यालयांकडील दि.१/६/२०२१ ते ३०/६/२०२१ अखेर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/३३३ दि.१२/७/२०२१ चे पत्र.

### हिशोब तपासणी अहवाल

विषय क्र. ५४३

शहर अभियंता कार्यालयाकडून येरवडा स.नं. १०३/२ सि.टि.एस. १९३४ ते १९४३ येथील मान्य करण्यात आलेल्या संमतीपत्रापैकी तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या बांधकाम प्रस्ताव प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/९८९ दि. ९/७/२०२१ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. १२ सन २०२१–२०२२ चा विचारासाठी.

### मागील सभेचे विषय

विषय क्र. ५४४

मा.अजय खेडेकर यांचे दि. ५/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.१८ क मध्ये खालील विविध विकास कामे करण्यासाठी र.रू. १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| | सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक, प्रभाग क्र १८ क मध्ये श्रीमंत भैरवसिंह घोरपडे उद्यान येथे ७ डी थिएटर उभारणे, बजेट कोड CE26A336/ SU1-1405 | १ कोटी | |
| | नविन सुचविलेली कामे: | | |
| १ | प्रभाग क्र. १८ क बचत गटातील प्रशिक्षक महिलांसाठी शिलाई मशिन वाटप करणे | | २० लक्ष |
| २ | प्रभाग क्र. १८ क फडगेट पोलिस चौकी परिसरात विविध विकास कामे करणे | | १० लक्ष |
| ३ | प्रभाग क्र. १८ क घोरपडे पेठ परिसरात पोस्ट ऑफिस जवळ विविध विकास कामे व तद्नुषंगिक कामे करणे | | १० लक्ष |
| ४ | प्रभाग क्र. १८ क मध्ये ड्रेनेज लाइन टाकणे व फरशी बसविणे व कॉंक्रिटीकरण करणे | | १० लक्ष |
| ५ | प्रभाग क्र. १८ क मध्ये विविध ठिकाणी शौचालय दुरूस्ती करणे | | १० लक्ष |
| ६ | प्रभाग क्र. १८ क विविध ठिकाणी साफसफाई करणे | | १० लक्ष |
| ७ | प्रभाग क्र. १८ क विविध ठिकाणी लोखंडी जाळया बसविणे | | १० लक्ष |
| ८ | प्रभाग क्र. १८ क मध्ये गजराज मित्र मंडळ परिसरात समाज मंदिर दुरूस्ती करणे. | | २० लक्ष |

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५४५

उप आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/३/२०२१ ते दि.३१/३/२०२१ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/४८ दि.४/५/२०२१ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५४६

मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि. १०/२/२०२१ चे पत्र.

पुणे पेठ वडगाव बुद्रुक स.न. १४ (पार्ट), १५ (पार्ट) (अपूर्वा मेडिकल ते क्राऊन बेकरी) मधून जाणारा रस्ता व पुणे पेठ वडगाव बुद्रुक स.न. १० (पार्ट) (खाडे गिरणी ते सनसिटी) मधून जाणारा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीकोनातून अपुरा पडत आहे. सदर रस्ता रुंद करणे आवश्यक आहे. म्हणून हा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१० (१) (ब) अन्वये रुंद करण्यात यावा.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५४७

पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाजगी रुग्णालये/नंर्सिंग होम व्यवसायांना नोंदणी देताना व दिलेल्या नोंदणीचे विहीतमुदतीनंतर नुतणीकरण करताना सन २०२१-२०२२ या चालु आर्थिक वर्षापासुन शुल्क आकारणी करणेस खालील नमुद बाब क्र. १ ते ५ मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेस व बाब क्र. ६ ची अमंलबजावणी सन २०२१-२०२२ या चालु आर्थिक वर्षापासुन करणेकरीता मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९७१ दि. १६/३/२०२१ चे पत्र.

१) सुधारीत दराने परवाना फी व विलंब शुल्काची आकारणी दि.०१/०४/२०२१ पासुन करणेस.

२) दिलेल्या परवान्याचे नुतनीकरण परवान्याची मुदत सपुंष्टात आलेल्या वर्षाच्या पुढील तीन वर्षासाठी नुतनीकरण देणेस.

३) अधिसुचनेनुसार वार्षीक परवाना शुल्क/ फी आकारणी १ ते ५ खाटांसाठी रक्कम रु. ५०००/- व ५ पेक्षा जास्त खाटा असलेल्या शुश्रुषागृहाला पुढील प्रत्येकी ५ वाढीव खाटांच्या टप्यासाठी रक्कम रु. ५०००/- प्रति ५ खाटा प्रमाणे वाढीव शुल्क आकारणेस.

४) यापुर्वी सन २०२१ च्या पुढील कालावधीसाठी जुन्या दराने परवाना फी स्विकारुन नर्सिंगहोम परवाना नोंदणी व नुतणीकरण करुन दिलेल्या व्यवसायधारकांकडुन शासन अधिसुचनेत नमुद केलेल्या सुधारीत दराने होणारी परवाना फी ची फरक रक्कम वसुल करणेस.

५) शुश्रुषागृहाच्या दि. ०१/०४/२०२१ पासुन पुढील कालावधीसाठी नुतनीकरण करुन दिलेल्या आस्थापंनेस त्यांच्या पुढील कालावधीच्या नुतनीकरण कालावधीसाठी लगतचे मागील नुतनीकरण करुन देतेवेळी आकारण्यात आलेले परवाना शुल्क + त्यावर २५% वाढीव शुल्कासह पुढील प्रत्येक तीन वर्षीय नुतनीकरणासाठी फक्त शुल्क/ परवाना फीची आकारणी करणेस.

६) परवाना नुतनीकरणासाठी विलंब झाल्यास संबधीत व्यवसायधारकांन कडुन विलंब फी खालील तक्त्यात नमुद केलेल्या सुधारीत दराने आकारणी करुन वसुल करणेस .

| प्रचलित पध्दत | | सुधारीत दराने आकारणी दि.०१/०४/२०२१ पासुन करणेस | |
|---|---|---|---|
| बेडस् संख्या | विलंब फी प्रतिमहिना | बेडस संख्या | विलंब फी प्रतिमहिना |
| १० बेडस् पर्यंत | रु.०५/- | ०५ बेडस पर्यंत | र.रु. ५०/- |
| १० बेडस्च्या पुढे | र.१०/- | ०६ बेडस पासुन पुढे | र.रु. १००/- |

७) नव्याने प्रथम परवाना देतेवेळी ज्या आर्थिक वर्षात संबधीत व्यवसायधारकाचा प्रस्ताव दाखल होवुन मान्यता मिळेल ते आर्थिक वर्ष धरुन एकुण तीन वर्ष कालावधीसाठी परवाना देणेस .

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५४८**

अग्निशमन सेवा पुरविणेच्या दरामध्ये मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे दरवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/अग्निशमन/७१ दि.२०/५/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५४९**

पुणे महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडील मनपा वसाहतीमध्ये राहणाऱ्या (रस्ता रुंदीकरण, पुरग्रस्त, गवनि पुर्नवसन व प्रकल्पबाधित) बिगर मनपा सदनिकाधारकांचे निवासी घरभाडे/लायसेन्स फी मध्ये भाडेवाढ करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सीएसओ/१३९३ दि.१८/२/२०१९ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ५५०**

मा.सौ.अश्विनी पोकळे यांचे दि. ७/१/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.४२ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक बजेट कोड CE22A548 /SJ10-2520 महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान स.नं.१३ आंबेगाव बुद्रुक येथील परिसरामध्ये विविध विकासाची कामे करणे | १ कोटी | --- |
| | नविन सुचविलेली कामे | | |
| १ | प्रभाग क्र.४२ ब धायरी बेनकरवस्ती परिसरातील संभाजीनगर येथील अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |
| २ | प्रभाग क्र.४२ ब धायरी येथील उंबऱ्या गणपती चौक ते भैरवनाथ मंदिर परिसरात रस्ता दुरूस्त व फर्निचर विषयक कामे करणे | --- | १० लाख |
| ३ | महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान स.नं.१३ आंबेगाव बुद्रुक येथील परिसरामध्ये विविध विकासाची कामे करणे | --- | १० लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान स.नं.१३ आंबेगाव बुद्रुक येथील परिसरामध्ये उर्वरित कामे करणे | --- | १० लाख |
| ५ | प्रभाग क्र.४२ ब धायरी गावठाण परिसरात विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ६ | प्रभाग क्र.४२ ब धायरी गावठाण येथे सुरू असलेल्या शिवसृष्टीचे उर्वरित काम पूर्ण करणे | --- | १० लाख |
| ७ | प्रभाग क्र.४२ ब धायरी गावामध्ये विविध ठिकाणी ब्लॉक बसविणे | --- | १० लाख |
| ८ | प्रभाग क्र.४२ ब डी एस के रोड चे उर्वरित काम करणे | --- | १० लाख |
| ९ | प्रभाग क्र.४२ ब समाविष्ट धायरी गावातील चावडी कटयाचे उर्वरित काम करणे | --- | १० लाख |
| १० | प्रभाग क्र.४२ ब पवळी चौक परिसरात ड्रेनेज विषयक कामे करणे | --- | १० लाख |

(मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.)
(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५५१

आरोग्य कार्यालयाकडील विविध विभागामार्फत सद्याच्या आकारण्यात येणारे प्रस्तावित मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या शुल्क दरात वाढ करून प्रस्तावित केलेल्या शुल्क दि.०१/०४/२०२१ पासून आकारणीस करण्यास मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१००७ दि.२२/३/२०२१ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५५२

पुणे महानगरपालिकेकडील कायदेशीर दस्तऐवजाचे मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे मसुदा फीमध्ये वाढ करणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची खालीलप्रमाणे मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विधी विभाग/१००८ दि.२२/३/२०२१ चे पत्र.
(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५५३

मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि. ७/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र.३४ क मधील सार्वजनिक शौचालयाची दैनंदिन स्वच्छता व देखभाल दुरूस्ती करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, बजेट कोड- सीई२२ए५४८/एसजे१०-३०७०, प्रभाग क्र.३४ क मधील अपुर्ण जीमचे काम पूर्ण करणे | १० लाख | -- |
| नविन सुचविलेले काम | | |
| प्रभाग क्र.३४ क मधील सार्वजनिक शौचालयाची दैनंदिन स्वच्छता व देखभाल दुरूस्ती करणे | -- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी
(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५५४

मा.सौ.ज्योती कळमकर, मा.सौ.स्वप्नाली सायकर व मा.अमोल बालवडकर यांचे दि. ७/१/२०२१ चे पत्र.

माझ्या प्रभागातील गायकवाड पेट्रोलपंपा समोरुन आशियाना पार्क - २, स.नं. २७७ बाणेर येथे जाणारा रस्ता ६ मिटरचा असून तो महापालिकेच्या कलम २१० अंतर्गत ९ मीटर करण्यात यावा.
(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५५५

मा.सौ.ज्योती कळमकर, मा.सौ.स्वप्नाली सायकर व मा.अमोल बालवडकर यांचे दि. ७/१/२०२१ चे पत्र.

माझ्या प्रभागातील आनंदबन क्लब औंध पासून ते ग्रीन पार्क सोसायटी बाणेर येथील भाग्यश्री बिल्डींग व स.नं. २७६ बाणेर पर्यंत असणारा रस्ता ६ मिटरचा असून तो कलम २१० अंतर्गत ९ मीटर करण्यात यावा.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५५६

पुणे महानगरपालिकेस आरोग्य विमा संरक्षण बाबत मार्गदर्शन/सल्ला देणेकरिता सेवा देणारे सल्लागार संस्थेचे पॅनल नेमणेकरिता एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट मा.महापालिका आयुक्त ठराव क्र.६/४९३ दि.२०/११/२०२० च्या मान्यतेनुसार मागविण्यात आले होते. प्राप्त झालेल्या सात संस्थांपैकी चार संस्थांनी (Edelweiss Gallagher, Global, Alliance. India Insure Risk Management ) त्यांच्या संस्थेच्या कामकाजाबाबत संगणकीय सादरीकरण केले आहे. या चारही संस्थांचे कामकाज पाहता त्या सर्वांना empanel करणे शक्य आहे. या कामाकरिता या संस्थांना कोणताही आर्थिक मोबदला पुणे महानगरपालिकेमार्फत दिला जाणार नाही .

तरी पुणे महानगरपालिकेस आरोग्य विमा संरक्षण बाबत मार्गदर्शन/सल्ला देणेकरिता स्वारस्य अभिरूची प्रस्ताव (EOI) मार्फत इच्छुक असलेल्या ३ संस्थांना empanel करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/५७२ दि. ११/१/२०२१ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि. १८/५/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र. ५५७

पुणे महानगरपालिकेच्या कै.शिवशंकर पोटे दवाखानाकरीता खरेदी करण्यात आलेल्य 3.0 Tesla MRI मशिनचे सीएमसी चार्जेस सिमेन्स हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड यांना रक्कम रू.१,२३,३६,९००/- (अक्षरी र.रू. एक कोटी तेवीस लाख छत्तीस हजार नउशे फक्त) अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३०९ दि. ५/७/२०२१ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. १३/७/२०२१ च्या सभेत ठरले होते.)

## संकीर्ण

विषय क्र. ५५८

प्रभाग क्र. ४० मधील कात्रज दुध डेअरीमधुन जाणारा २४ मी. रुंद डी.पी. रस्ता विकसित करणे या कामासाठी र.रु.३१.५० लक्षाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/३२६ दि.८/७/२०२१ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक, यादी क्र. ए-२, पान क्र. १५२, बजेट कोड CE20A102/A2-304, प्रभाग क्र. ४० मधील स.नं. २८, २९ मधुन जाणारा १२ मी.डी.पी.रस्ता विकसना अंतर्गत रिटेनिंग वॉल बांधणे | ३१.५०लक्ष | ---- |
| नविन सुचवलेले काम<br>प्रभाग क्र. ४० मधील कात्रज दुध डेअरीमधुन जाणारा २४ मी. रुंद डी.पी. रस्ता विकसित करणे | ---- | ३१.५० लक्ष |

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.